**पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा**
**पोलीस शिपाई व पोलीस शिपाई बॅण्डस्मन पदभरती -२०२२-२३**
**बॅण्डस्मन उमेदवारांसाठी महत्वाची सुचना**

**********

मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती 2022-23/173/2023,मुंबई दि.06.06.2024 मध्ये देण्यात आलेल्या आदेशानुसार बुलडाणा जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई पदाची 125 व पोलीस शिपाई (बॅण्डस्मन) पदाची 08 रिक्त असलेली पदे भरण्याकरीता भरती प्रक्रिया दिनांक 19.06.2024 ते . 03/07/2024 या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. पोलीस शिपाई (बॅण्डस्मन) उमेदवारांची शारीरिक व मैदानी चाचणी दिनांक 02.07.2024 व 03.07.2024 रोजी घेण्यात येणार आहे.

2/- मा. अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक अपोमसं/प्रशि/पोशि भरती/बॅण्डस्मन/173/2023 दि 25/06/2024 मध्ये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे शारीरिक व मैदानी चाचणीमध्ये किमान 50% गुण प्राप्त केलेल्या बॅण्डस्मन उमेदवार यांची खालील नमुद केल्याप्रमाणे अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) घेणेकीरता समीती गठीत करण्यात आली असुन सदरील अर्हता चाचणीची (कौशल्य चाचणी) संभाव्य दिनांक 08.07.2024 रोजी कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, बुलडाणा येथे घेण्याचे नियोजीत आहे.

| अ.क्र. | कौशल्य चाचणी प्रकार | गुण |
|---|---|---|
| 1 | वाद्यवादन (Practical Test ) वाद्य वाजविण्यात पारंगत आहे ते वाद्य वाजविण्याचे कौशल्य प्रात्यक्षिक सादरीकरण | 50 गुण |
| 2 | वाद्यांचे / पाश्चात्य, भारतीय संगीताचे ज्ञान | 25 गुण |
| 3 | स्वरांचे ज्ञान, स्वर ओळखणे, स्वर किंवा लय गाता / वाजविता येणे | 25 गुण |
| | एकुण गुण | 100 गुण |

**3/- मैदानी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या बॅण्डस्मन उमेदवार यांना बँड पथकातील वाद्यांची (क्लॉरनेट, सेक्सोफोन, ट्रम्पेट, इपोनियम, बेस ड्रम व साईड ड्रम ) माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक असुन उमेदवारांनी त्यांचे अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) मध्ये प्रात्यक्षिक सादरीकरण करणेकरीता आपलेकडील वाजविण्याचे वाद्य व माऊथपीस / रिड सोबत आणावे.**
माऊथपिस / रिड

4/- सदर अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) ही 100 गुणांची असुन त्यापैकी उमेदवारास कमीत कमी 50 गुण प्राप्त होणे आवश्यक आहे. सदर चाचणी ही अर्हता चाचणी असल्याने त्यामध्ये प्राप्त झालेले गुण गुणवत्तायादी तयार करतांना विचारात घेतले जाणार नाहीत.

5/- अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी ) मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधुन रिक्त जागेच्या 1:10 या प्रमाणात पात्र ठरणा-या उमेदवारांचीच लेखी परिक्षा घेण्यात येणार आहे.

स्थळ - पोलीस मुख्यालय बुलढाणा

दिनांक - 02/07/2024

( सुनिल कडासने )
पोलीस अधीक्षक, बुलडाणा तथा,
अध्यक्ष, पोलीस भरती समिती-2022-23

Scanned with OKEN Scanner